पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. २२२ दि.०१/०२/२०२०**

हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

काळ आला पण वेळ आली नव्हती.

आत्महत्या करणारे महिलेचे हडपसर पोलीस स्टेशनचे पोलीसांनी वाचवले प्राण

मा.पोलीस आयुक्त सो पुणे शहर यांनी नियत्रंण कक्षाचे कॉलला बिट मार्शल हे त्वरीत घटनास्थळी पोहचुन कारवाई करतील असे आदेशित केलेले आहे. आज दिनांक ०१/०२/२०२० रोजी पो.कॉ.अमोल बाबर व पो.कॉ. विलास राठोड यांना हडपसर बिट मार्शल म्हणुन ड्युटी होती. हडपसर येथे राहणारे एका महिलेने दुपारी ०१/०० वाजण्याचे सुमारास विषारी औषध घेतले असलेबाबत व पोलीस मदत पाहीजे असलेबाबत नियत्रंणकक्ष पुणे शहर येथे फोन करुन कळविल्याने नियत्रंणकक्ष पुणे शहर यांनी त्वरील हडपसर बिट मार्शल यांना घटनास्थळी जाणेबाबत आदेशित केले. हडपसर बिट मार्शलवरील कर्मचारी अमोल बाबर व विलास राठोड यांनी लगेचच घटनेचे गांभीर्य ओळखुन घटनास्थळी धाव घेतली. तसेच माहीती मिळताच मपोउनि आर आर पाटील ,पो ना बेंद्रे ,पो शि कर्पे हे सुध्दा घटनास्थळी दाखल झाले घटनास्थळी महिलेने तीचे राहते प्लॅटचे घराचा दरवाजाची कडी लावुन घेतलेली होती. पोलीसांनी कोणताही विचार न करता दरवाजा तोडुन घरात प्रवेश केला असता सदरची महिलेने हाताची नस कापल्याचे तसेच विषारी औषध पिल्याने ती बेशुध्द असल्याचे आढळुन आले. पोलीसांनी कोणत्याही क्षणाचा विलंब न करता पोलीसांनी महिलेस रिक्षात घालुन प्रथम आबणे हॉस्पीटल हडपसर पुणे येथे नेले असता डॉक्टरांनी तीची परिस्थिती चिंताजनक असल्याने तिस सहयाद्री हॉस्पीटल पुणे येथे नेवुन ॲडमिट केले. तेथे तिचेवर उपचार चालु असुन तीची तब्येतीमध्ये सुधारणा होत आहे.

सदर महिलेचे नातेवाईकांनी डॉक्टरांशी चर्चा केले नंतर सदर महीला हीस उपचाराकरीता आणखी थोडा जरी उशीर झाला असता तर तिने प्राण गमावले असते असे सांगीतले. तेव्हा पिडीत महिलेचे नातेवाईकांनी पोलीसांचे मनापासुन आभार मानले आहेत.

सदरची कामगीरी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश साठे सो यांचे मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उप निरीक्षक राजश्री पाटील, पोलीस कर्मचारी अमोल बाबर व पो.कॉ. विलास राठोड यांनी केली आहे.



मपोउनि आर आर पाटील ,पो ना बेंद्रे ,पो शि कर्पे व मार्शल कर्मचारी अमोल बाबर व विलास राठोड यांचा सत्कार करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री रमेश साठे हडपसर पोलीस स्टेशन